# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### नळगंगा वैनगंगा नदीजोड प्रकल्पाचा लाभ पश्चिम विदर्भातील वाशिम जिल्ह्याला मिळण्याबाबत

**(१) ३३९ (१७-०४-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळगंगा वैनगंगा नदीजोड प्रकल्पाचा लाभ पश्चिम विदर्भातील वाशिम जिल्ह्याला मिळत नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मधील दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढवून दुष्काळमुक्त करण्यासाठी महत्वाकांक्षी असलेल्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा लाभ वाशिम जिल्ह्याला मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२७-०६-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पा अंतर्गत फेरनियोजनानुसार वाशिम जिल्ह्यातील अस्तित्वातील १३ लपायो (ता.कारंजा) व ७ मध्यम/ल.पा प्रकल्प अशा एकूण २० प्रकल्पांमधील तुट भरुन काढण्याच्या दृष्टीने ५२.४५ दलघमी पाण्याचे नियोजनाचा अभ्यास करण्यात येत आहे. ही प्रकल्पीय तुट भरुन काढल्यानंतर ७८६८ हेक्टर सिंचन क्षमता पुर्नस्थापित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच वाशिम जिल्ह्याचा सिंचन अनुशेष भरुन काढण्याचे दृष्टीने अस्तीत्वातील प्रकल्पांची उंची वाढविणे, नवीन साठवण स्थळे शोधुन तपासून सिंचन अनुशेष भरुन काढणे या दृष्टीने अभ्यास करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे मुख्य कालवा व संलग्न स्थळ तसेच लाभक्षेत्र सविस्तर सर्वेक्षणास सुरुवात झाली असून सदर सर्वेक्षण व अन्वेषनाचे कामात वाशिम जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. सर्वेक्षणाचे अंती व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) लागू नाही.

---

## राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ सुरु करण्याबाबत

**(२) ४२४ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य प्रदेश मधील इंदिरा गांधी राष्ट्रीय आदिवासी विद्यापीठ तसेच आंध्रप्रदेश मधील केंद्रीय आदिवासी विद्यापीठ या दोन विद्यापीठांच्या धर्तीवर राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी पहिले आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात विभागाने अहवाल तयार केला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात राज्यात आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या असून त्याबाबत काही उद्दिष्ट, रोडमॅप, आराखडा तयार करण्यात आला असून आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा या दृष्टीने त्यांच्या कौशल्याला चालना देणारे अभ्यासक्रम सुरु करावेत आणि त्यांना अधिकाधिक रोजगाराभिमुख प्रशिक्षण मिळावे यासाठी आदिवासी विद्यापीठ सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत तयार केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने विद्यापीठ कोणत्या ठिकाणी, किती जागेत उभारण्यात येणार असून किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विद्यापीठ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२३-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाची संकल्पना आणि स्थापना प्रामुख्याने आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आली. तथापि, महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना स्थलांतरित होऊन गोंडवाना विद्यापीठाद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या उच्च शिक्षणाच्या संधींचा लाभ घेणे शक्य होत नाही. राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ प्रस्ताविण्यात आले होते. मात्र ते एकाच जिल्ह्यात स्थापन करावे लागेल. आदिवासी जमाति राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये विखुरलेल्या आहेत. आदिवासी जमातितील विद्यार्थ्यांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण देऊन सर्व समावेशक शिक्षणाची भावना त्यांच्या मनात रुजविणे गरजेचे आहे. सदरची वस्तुस्थिती विचारात घेऊन आदिवासी जमातितील विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याऐवजी आदिवासी बहुल क्षेत्रातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठांमधील आदिवासी अभ्यास केंद्राना बळकटी देण्याचा तसेच आदिवासीबहुल क्षेत्रातील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नव्याने आदिवासी केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये घेण्यात आला आहे. मानववंशशास्त्र अभ्यास, उपजिविका अभ्यास, आर्थिक सक्षमीकरण ही उद्दिष्ट्ये साध्य

करण्यासाठी विविध आदिवासी भाषांचा अभ्यास, धातूशास्त्र, कापड आणि त्याचे उत्पादन तंत्रज्ञान, औषधी वनस्पतींचा अभ्यास, खनिजशास्त्र आणि आदिवासी भाषांचा अभ्यास, वन आणि पर्यावरणीय पर्यटन, उद्योजकता, जलमार्ग व्यवस्थापन, पूर आणि पूरोत्तर व्यवस्थापन असे अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम, उद्योगक्षम बनविण्यासाठी सदर अभ्सास केंद्रे कार्यरत राहतील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बदलापूर (जि.ठाणे) येथील उल्हास नदी पूर नियंत्रण रेषेचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत

**(३) ४४६ (१७-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील उल्हास नदी पूर नियंत्रण रेषेचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत तेथील स्थानिकांकडून मागणी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

याबाबत विविध लोकप्रतिनिधी, स्थानिक रहिवासी, पर्यावरण प्रेमी यांचेकडून मागणी होत आहे.
(२) तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांचे समवेत दिनांक २८/०९/२०२२ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार आवश्यक त्या ठिकाणी पुर नियंत्रण रेषेबाबत जलसंपदा विभागाने नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांसमवेत उल्हास नदीच्या पूरेरेषेचे फेरसर्वेक्षण हे आय.आय.टी.,रुरकी या संस्थेकडून करावे व याबाबतचा खर्च मागणी करणाऱ्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेनी करावा, असे निर्देश दिनांक ०८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिले आहेत.

त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर अंदाजपत्रक तयार करुन कुळगाव बदलापूर नगरपरिषदेची मान्यता व निधी मिळणेसाठी क्षेत्रिय कार्यालयाने मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद, बदलापूर ठाणे यांना दिनांक २१/०४/२०२३ व दिनांक २५/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. परंतु, याबाबत संबंधित नगरपालिकेचा अहवाल क्षेत्रिय कार्यालयास अद्याप अप्राप्त आहे.

तत्कालिन मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९ ऑगस्ट, २०२४ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे कुळगाव बदलापूर येथील उल्हास नदीवरील पूरेषा बाबत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत तत्कालिन मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांनी नदीच्या मध्यापासून काही अंतर सोडून बांधकामास परवानगी देण्यासंदर्भात प्रचलित शासन धोरणामध्ये सूधारणा करणेबाबतचा प्रस्ताव सक्षम स्तरावर सादर करणेबाबतचे निर्देश महसूल व वन विभाग (मदत व पूनर्वसन) व नगरविकास विभागास देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठीत करुन प्रादेशिक विकासाचा अनुशेष दूर करण्याबाबत

**(४) ८११ (१७-०४-२०२५) श्री.अंबादास दानवे, श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक १७७०९ ला दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भ वैधानिक विकास महामंडळाची मुदत दिनांक ३० एप्रिल,२००० रोजी पूर्ण झाली असून या मंडळाच्या पुनर्रचनेसाठी वैधानिक विकास मंडळांच्या मुदवाढीसाठीचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेल्या अर्धशासकीय पत्राला दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी होवूनही केंद्र शासनाची मान्यता मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य शासनाकडून पुन्हा स्मरणपत्रे किंवा बैठक घेण्यात आली आहे काय, असल्यास, शासनाने राज्याच्या विविध भागांचा प्रादेशिक असमतोल निश्चित करण्यासाठी पुन्हा एकदा सत्यशोधन समितीची स्थापना करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे विदर्भ वैधानिक विकास महामंडळाच्या माजी तज्ज्ञ सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे पुनर्गठन झाल्यानंतर राज्यातील विविध प्रदेश आणि क्षेत्रामध्ये असंतुलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सुचविण्यासाठी सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(४) असल्यास, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठीत करण्यासाठी केंद्र शासनाकडून मंजुरी मिळवून विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन, रस्ते, शिक्षण, कृषी, ऊर्जा, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम विभागांच्या कामात सन २०१९ ते सन २०२४ या कालावधीत वर्षनिहाय विभाज्य निधी वाटप व प्रत्यक्ष वितरीत निधी याची तपशीलवार माहिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने महत्वाचे असलेल्या वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१९-०६-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) अंशत: हे खरे आहे.

वैधानिक विकास मंडळांचे पुनर्गठन करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांच्या स्तरावरुन केंद्र शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात येत आहे. वैधानिक विकास मंडळे पुनर्गठीत झाल्यानंतर सत्यशोधन समितीची स्थापना करण्याबाबत विचार करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) विदर्भ मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांची मुदत दिनांक ३०/०४/२०२० रोजी संपृष्टात आली असली तरी मा.राज्यपाल यांनी विहित केलेल्या सुत्रानुसार वार्षिक योजनेतील विभाज्य नियतव्ययाचे वाटप करण्यात येत आहे.
(५) राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मडळांची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आली आहे. मा.मत्रिमंडळाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ च्या बैठकीत सदरहू विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याचा तसेच त्या मंडळांना वैधानिक विकास मंडळ असे संबोधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे मंत्रिमंडळ निर्णयाच्या अनुषंगाने मा.राज्यपाल महोदयांनी दिनांक २८/१०/२०२२, दिनांक १२/१२/२०२२ व दिनांक ०९/०४/२०२३ व दिनांक २२/०८/२०२४ च्या पत्रान्वये गृह मंत्रालय, भारत सरकार यांना विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याची विनंती केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाडळसे येथील निम्न तापी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत मंजुरी मिळण्याबाबत

**(५) ९१० (१७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाडळसे येथील निम्न तापी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रधानमंत्री कृषी संजिवनी योजनेंतर्गत जळगाव जिल्ह्यातील ६ तालुक्यांसह धुळे जिल्ह्यातील २ तालुक्यांसाठी संजिवनी ठरणाऱ्या प्रकल्पास मंजुरी मिळाली असल्याची बाब दिनांक २५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी प्रलंबित असलेल्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही व उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०२-०५-२०२५) :** (१) केंद्रीय जल आयोगाने निम्न तापी प्रकल्पाच्या टप्पा-१ च्या रुपये २८८८.४८कोटी एवढ्या एकूण किंमतीस दिनांक ११/०३/२०२४ रोजी मान्यता दिली आहे. या मान्यतेनुसार, भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत, Investment Clearance Committee या समितीने त्यांच्या दिनांक २३/०४/२०२४ रोजीच्या २२ व्या बैठकीरा निम्न तापी प्रकल्पाच्या टप्पा-१ च्या रुपये २८८८.४८ कोटी एवढ्या एकूण किंमतीस मान्यतेची शिफारस केली आहे. सदर प्रकल्प PMKSY योजनेत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासन पत्र दिनांक ३१/०५/२०२४ अन्वये केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावातील मुद्यांचे अनुपालन दिनांक २७/०१/२०२५ अन्वये केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे.
(२) सन २०२४-२५ वर्षात सदर प्रकल्पांसाठी रुपये ९९.३९७८ कोटी एवढ्या निधीची तरतुद केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मराठी भाषा कार्यशाळा सुरु करण्याबाबत

**(६) ११९१ (२४-०४-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय मराठी संमेलनाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त पुणे व इचलकरंजी शहरात माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास झालेल्या स्मृती जागर कार्यक्रमात सीमा भागासह राज्यभरात मराठी भाषेच्या कार्यशाळा सुरू करण्याची गरज असल्याचे मत साहित्यिकांनी व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्ञानभाषा मराठीचा प्रचार, प्रसार आणि वापर वाढविण्यासाठी, राज्यभरात मराठी भाषेची कार्यशाळा आयोजित करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-०६-२०२५) :** (१) अखिल भारतीय मराठी साहित्य मंहामंडळाकडून संमेलनाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त पुणे व इचलकरंजी शहरात स्मृती जागर कार्यक्रम साजरा करण्यात आलेला नाही.

(२) मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील राज्य मराठी विकास संस्थेमार्फत संस्थेच्या उद्दिष्टांनुसार ज्ञानभाषा मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आणि वापर करण्यासाठी मराठी भाषेला ज्ञानभाषा प्रचार, प्रसार आणि वापर वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत तसेच खालीलप्रमाणे विविध उपक्रम राबविले जातात.

१. राज्य मराठी विकास संस्थेच्या उद्दिष्ट क्र.३० मध्ये नमूद केल्यानूसार भाषिक पाया सुधारण्यासाठी, अध्ययन सामग्री निर्माण करणे, प्रशिक्षणाची उपकरणे विकसित करणे व अन्य आवश्यक उपक्रम राबविण्यात येतात..

२. राज्य मराठी विकास संस्थेच्या उद्दिष्ट क्र.१८ मध्ये मराठी भाषा व संस्कृतीच्या विकासाचे साधन म्हणून समांतर लोकशिक्षणाची भूमिका पार पाडण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेकडून मराठी भाषा प्रचार-प्रसार या उपक्रमाअंतर्गत कार्यशाळांचे तसेच मराठीचा गुणवत्तापूर्ण वापर करता यावा यासाठी युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

३. वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी पुस्तकांचे गाव हा उपक्रमदेखील सदर संस्थेकडून राबविण्यात येत असून सदर उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गावपातळीवर वाचकांना पुस्तके उपलब्ध करुन दिली जात आहेत. तसेच या उपक्रमाचा विस्तार देखील करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदमापूर (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील श्री बाळुमामा देवालय तीर्थश्रेत्रास ‘अ’ वर्ग दर्जा देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) ११९२ (२४-०४-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदमापूर (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील श्री बाळूमामा देवालय देवस्थानला 'अ' वर्ग दर्जा देऊन आदमापूर ग्रामपंचायतीला वार्षिक एक कोटी रुपयांचा विशेष निधी देण्याची मागणी आदमापूर ग्रामपंचायतीने शासनाकडे माहे डिसेंबर, २०२४ वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२५-०६-२०२५) :** (१) व (२) श्री.बाळूमामा देवालय (ता.कागल जि.कोल्हापूर) आदमापूर तीर्थक्षेत्रास अ वर्ग दर्जा देण्याबाबतचे निवेदन ग्रामपंचायत आदमापूर यांनी मा.सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांना उद्देशून दिनांक २४/१२/२०२४ रोजी विनंती केल्याचे दिसून येते. मात्र, सदर तीर्थक्षेत्रास "अ" वर्ग दर्जा देण्याबाबतचे सदरचे पत्र/प्रस्ताव आद्यप या विभागास प्राप्त झालेला नाही. शासनाकडे विहीत पध्दतीने प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

तथापि, शासनाने यापूर्वीच या तीर्थक्षेत्रास "ब वर्ग" दर्जा देऊन विविध विकास कामांसाठी दिनांक ०६/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये रुपये ७७.०८ लक्ष व दिनांक १३/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये रुपये ११६.७२ लक्ष ची प्रशासकीय मान्यता प्रदान करून संपूर्ण निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवन नाही.

---

## धुळे जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गतची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(८) १३०५ (२४-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सन २०२४ पर्यंत जलजीवन मिशन योजनेंतर्गत नळाचे शुध्द पाणी मिळावे या उद्देशाने धुळे जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेच्या ४५१ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन आतापर्यंत केवळ १४६ कामे पूर्ण झाली आहेत तर ३०५ कामे अजुनही प्रलंबित अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साक्री तालुक्यातील कालटेक कोर्डे, पचाळे व शिरपूर तालुक्यातील खैरखुंटी येथील कामांना मंजुरी मिळूनही ६८ टक्के कामे सुरु करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास सदर योजनेची कामे प्रलंबित राहण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू कामे निधी उपलब्धतेनुसार सुरु करुन पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत?

**श्री.गुलाबराव पाटील (२४-०६-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

धुळे जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ४५१ नळ पाणीपुरवठा योजना मंजूर असून त्यापैकी १९१ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित २५८ योजना प्रगतीत असून त्यांची भौतिक प्रगती पुढीलप्रमाणे आहे -

१५३ योजना ७५% ते ९९ %,
५७ योजना ५० % ते ७५ %,
२५ योजना २५ % ते ५० %,
२३ योजना १ % ते २५ %
२ योजना - सुधारित होत असल्याने व वन विभागाची परवानगी अप्राप्त असल्याने योजनांची कामे सुरु करण्यात आलेली नाहीत.

धुळे जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ११ योजनांची कामे प्रगतीपथावर असून १ योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. उर्वरित १० योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

साक्री तालुक्यातील मौजे कालटेक, ता.साक्री येथील योजनेकरीता आवश्यक वन विभागाची परवानगी दिनांक ०४/०२/२०२५ रोजी मिळाली असून योजनेचे काम २० % झाले आहे. मौजे पचाळे, ता.साक्री योजनेकरीता आवश्यक वन विभागाची परवानगी दिनांक १७/०२/२०२५ रोजी मिळाली असून योजनेचे १५ % काम पूर्ण झाले आहे. तसेच उक्त २ योजना सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

साक्री तालुक्यातील कोर्डे व शिरपुर तालुक्यातील खैरखुंटी योजनांना वनविभागाची परवानगी प्रलंबित आहे.

(३) शासनाकडून माहे एप्रिल २०२५ मध्ये रुपये १२७३.१४ लक्ष निधी उपलब्ध करण्यात आला असून सर्व निधी खर्च करण्यात आला आहे व देयके अदा करतेवेळी अंतिम देयकांचा प्राधान्याने विचार केलेला आहे. अपूर्ण योजना पूर्ण करण्याचे काम सुरु आहे.

(४) केंद्र शासनाकडून ऑगस्ट २०२४ पासून निधी उपलब्ध न होणे, जागेची परवानगी, तांत्रिक बदलामुळे अंदाजपत्रक सुधारित करावे लागणे इत्यादी कारणांमुळे विलंब होत असून सदर योजना डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना पुनर्मल्यांकनासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याबाबत

**(९) १४०८ (२४-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक वर्ष २०२१ ते २०२४ या चार वर्षांच्या कालावधीत मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या कला, वाणिज्य, विधी, विज्ञान, तंत्रज्ञान विद्या शाखेच्या विविध परिक्षांच्या पुनर्मूल्यांकनासाठी जवळपास ८ लाख ८ हजार ४५५ रुपये एवढे शुल्क विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला भरले असल्याचे माहे, डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठातर्फे एका विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून २५० रुपये तर राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १२५ रुपये शुल्क तर एका विषयाच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० रुपये आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २५ रुपये तसेच गरज असल्यास शिक्षकांना प्रवास भत्ता ही द्यावा लागत असल्याने त्याचा आर्थिक भार विद्यार्थ्यांवर पडत असून बहुसंख्य विद्यार्थी हे पुनर्मुल्यांकनानंतर उत्तीर्ण होतात असे निदर्शनास आले

असल्याने विद्यापीठाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुनर्मुल्यांकन शुल्क कमी करण्याबाबत तसेच विद्यापीठाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागू नये यासाठी उत्तर पत्रिका तपासताना काळजीपुर्वक तसेच जबाबदारीने तपासण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१७-०६-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठातर्फे एका विषयाच्या पुनर्मुल्यांकनासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून २५० रुपये तर राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून १२५ रुपये आणि एका विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छाया प्रतींसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५० आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २५ रुपये एवढे शुल्क आकारण्यात येते. उत्तरपत्रिकांची तपासणी OSM (On screen Marking) पध्दतीने होत असल्याने यासाठी शिक्षकांना प्रवासभत्ता देण्यात येत नाही. त्यामुळे, विहित शुल्काशिवाय शिक्षकांच्या प्रवासभत्त्याचा आर्थिक बोजा विद्यार्थ्यांवर पडत नाही. तसेच, प्रथम मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन यासाठी वेगवेगळे शिक्षक असल्या कारणास्तव स्वाभाविकरित्या थोड्याफार प्रमाणे गुण वाढ/ घट होते. ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये वाढ होऊन उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक गुण प्राप्त झाले तरच असे विद्यार्थी उत्तीर्ण होतात.
(३) मुंबई विद्यापीठामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६ पर्यंत पुनर्मुल्यांकनाचे शुल्क सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये ५०० तर राखीव प्रवर्गासाठी रुपये २५० होते. पुढे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विद्यापीठाने सदर शुल्क निम्म्यापर्यंत म्हणजेच सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये २५० तर राखीव प्रवर्गासाठी रुपये १२५ केलेले आहेत. तसेच, विद्यापीठाकडून शिक्षकांना उत्तर पत्रिका काळजीपूर्वक तसेच जबाबदारीने तपासण्याबाबतच्या सूचना देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पांगरे बुद्रुक (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(१०) १५३० (२४-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पांगरे बुद्रुक (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथील धरणातून परिसरातील १४ गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशन योजनेंतर्गत पांगरे बुद्रुक प्रादेशिक नळ पाणी योजना मंजूर होऊन ४ वर्षे होऊनही सदर गावांना पाणी मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पांगरी बुद्रुकसह १४ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गतिमान करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२४-०६-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

जलजीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत पांगरे (बु.) व १३ गावांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांनी दिनांक १३/०४/२०२२ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. त्यास अनुसरून दिनांक ११/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २५६५.०४ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण करून, सदर योजनेच्या कामांकरीता दिनांक ०६/१०/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. स्वीकृत निविदेनुसार एक वर्ष संचालनसह निविदेची मुदत दिनांक ०५/१०/२०२५ पर्यंत आहे. म्हणजेच योजना मंजूरीपासून सुमारे तीन वर्षाचा कालावधी झाला आहे.

(२) मूळ मंजूर योजनेनुसार योजनेचा उद्धव खाजगी मालकीच्या जागेत प्रस्तावित होता.परंतु सदरहू जागा प्राप्त न झाल्याने पांगरे बु. चिंचवाडी धरणाच्या खालील बाजूस जलसंपदा विभागाच्या ताब्यातील जागा प्राप्त करून घेतली. त्या ठिकाणी उद्धव व जलशुध्दीकरण केंद्र घेऊन, त्यानुसार योजनेच्या संकल्पनात आवश्यक बदल प्रस्तावित करून सुधारित योजनेस तांत्रिक मान्यता प्रदान केली असून, सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार कामे प्रगतीपथावर आहेत.

योजनेच्या साठवण टाक्यांच्या जागा तसेच योजनेची पाईप लाईन अंथरण्यास विरोध करून थांबविण्यात आलेली कामे लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी तसेच तहसिलदार, राजापूर यांच्या समन्वयाने सोडविण्यात येत असून, तेथील साठवण टाक्यांच्या जागा ताब्यात घेऊन कामे शीघ्र गतीने पूर्ण करण्यात येत आहेत. सुधारित योजनेनुसार प्रगती ७०% इतकी झाली आहे. माहे डिसेंबर २०२५ पर्यंत योजना पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यात राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेचे अनुदान उपलब्ध करून देणेबाबत

**(११) १५५८ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेची विमा सुरक्षा कवच अनुदानाची सुमारे २७ लाख रुपयांची रक्कम प्रलंबित असल्याने लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त विमा सुरक्षा अनुदानाची रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२०-०६-२०२५) :** (१) यासंदर्भात शिक्षणाधिकारी (योजना), जि.प. जळगांव यांच्या दिनांक ०२/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये २१ लाभार्थ्यांकरीता रुपये २६.१७ लक्ष अनुदान मागणीचा प्रस्ताव शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर करण्यात आला होता.त्यानुंषंगाने शिक्षण संचालक (योजना) यांनी शासन प्रस्ताव सादर केला होता.

(२) शिक्षण संचालक (योजना) यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ३१/०३/२०२५

अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानतून रुपये २६,१७,२१२/- एवढे अनुदान जळगांव जिल्ह्यातील २१ लाभार्थ्यांकरीता वितरीत करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तापी पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत कुऱ्हा-वडोदा उपसा सिंचन योजनेच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(१२) १५६८ (१७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तापी पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत सन १९९९ मध्ये सुरु झालेल्या कुऱ्हा-वडोदा उपसा सिंचन योजनेच्या (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) मुख्य पाईपलाईन चे काम ९० टक्के पूर्णत्वास आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पाईपलाईनचे काम पूर्ण करून शेतीपर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी निधीची आवश्यकता असून कुऱ्हा-वडोदा उपसा सिंचन योजनेच्या उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करून देणेसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
कुऱ्हा वढोदा उपसा सिंचन योजना ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव या योजनेच्या मुख्य पाईपलाईनच्या एकूण १३१४० मी. पैकी १०७८४ मी. लांबीचे ८२% काम पूर्ण झाले आहे.
(२) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण रुपये १५.०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, पर्यावरण मान्यतेअभावी सद्य:स्थितीत प्रकल्पाची कामे बंद आहेत. पर्यावरण मान्यतेचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाने केंद्र शासनास सादर केला आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर उर्वरित कामाचे नियोजन करून व आवश्यक निधीची तरतूद करून कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील हर घर जल योजनेचे कामांतर्गत नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(१३) १८९५ (२४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्याचे अनुषंगाने राबविण्यात आलेल्या हर घर जल योजनेचे कामांतर्गत बंधाऱ्यापासून ते गाव पाड्यापर्यंत टाकण्यात आलेली पाणी पुरवठ्याची पाईप लाईन ही डहाणू-नाशिक राष्ट्रीय महामार्गालगतची साईड पट्टी खोदून टाकण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर साईड पट्टीवर एअर वॉल उभारण्यात आलेले असून त्यामुळे भविष्यात या ठिकाणी भीषण अपघात होवून मनुष्यहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या भागातील नाशिक-डहाणू राष्ट्रीय महार्गाच्या चौपदरीकरणाचे काम होणार असून रस्ता रूंदीकरणाच्या या कामामुळे भविष्यात उपरोक्त नमूद पाण्याच्या पाईप लाईनमध्ये बिघाड झाल्यास दुरूस्तीच्या कामाकरीता जल जीवन मिशन यंत्रणेला राष्ट्रीय महामार्ग खोदावा लागण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू वस्तुस्थिती लक्षात घेता मोखाडा येथे पाणी पुरवठ्याची पाईप लाईन टाकताना करण्यात आलेले नियमोल्लंघन तसेच भविष्यात याठिकाणी उद्भवणाऱ्या अडचणी व त्यामुळे शासनाचे होणारे अधिकचे नुकसान लक्षात घेता या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच येथील आदिवासींचे दृष्टीकोनातून महत्वाची असलेली हर घर जल योजना भविष्यातही सुरळीत व सक्षमपणे कार्यरत रहावी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२४-०६-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याच्या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या हर घर जल योजनेचे कामांतर्गत उद्भवापासून ते गाव पाड्यापर्यंत टाकण्यात आलेली पाणी पुरवठ्याची पाईप लाईन ही डहाणू-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर साईडपट्टीच्या बाजूस न खोदता लगतच्या उपलब्ध जागेत टाकण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

एअर वॉल्व उभारणीने रस्त्याच्या रहदारीस कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवणार नाही, अशा पध्दतीने उभारणी करण्यात आलेली असून भविष्यात यामुळे अपघात होण्याची शक्यता दिसून येत नाही.

(३) हे खरे नाही.

जल जीवन मिशन हा केंद्रशासनाचा कालबध्द कार्यक्रम असल्याने विहीत मुदतीत कामाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे रितसर प्रस्ताव सादर करून, त्यास तत्वतः मान्यतेनंतर प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर दिलेल्या आखणीनुसार जलवाहिनी अंथरण्यात आलेली आहे. संबंधित प्राधिकरणाकडून आकारण्यात आलेले शुल्क रुपये १५.४३ लक्ष बँक गँरेंटी स्वरूपात, रुपये २५.७२ लक्ष Online स्वरूपात, रुपये १२.८० लक्ष भारत कोश पोर्टल द्वारे, रुपये २.३० लक्ष (१८% GST) D.D स्वरूपात (ना परतावा रक्कम), भरणा करण्यात आलेले आहे. भविष्यात डहाणू-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता रुंदीकरणाच्या अंमलबजावणी वेळी सदर प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली आवश्यकता भासल्यास Utility Shifting बाबीमध्ये pipe line shifting चा समावेश करण्यात येवून पाईप लाइनची पुनःस्थापना करणे शक्य होणार आहे. रस्ता रुंदीकरणापूर्वी पाईप लाईन रस्त्याच्या कडेला असल्याने पाईप लाईन दुरुस्तीसाठी गरज पडल्यास रस्ता खोदावा लागणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भौगोलिक दृष्ट्या बिकट असलेल्या मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पाणी टंचाईचे स्वरूप लक्षात घेता व जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजनेची विहीत कालावधीत अंमलबजावणी करून पाणीपुरवठा सुरू करण्याच्या उद्दिष्टाने राष्ट्रीय महामार्गालगत उपलब्ध जागेत, महामार्ग प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली आखून दिलेल्या मार्गावर पाईप लाईन टाकण्यात येवून पाणीपुरवठा सुरू

करण्यात आलेला आहे. सदर पाईप लाईन टाकतांना नियमोल्लंघन करण्यात आलेले नसून आदिवासीचे दृष्टीकोनातून महत्वाची असलेली पिण्याच्या पाण्याची योजना (हर घर जल) भविष्यात सुरळीत व समर्थपणे कार्यरत राहण्याबाबत खबरदारी घेण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील १०८ कृषी उत्पन्न बाजार समित्यांना एक हजार मॅट्रिक टन शेतमाल साठवणूक क्षमतेची गोदामे बांधून देण्याबाबत

**(१४) १९३१ (२४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाने १०८ कृषी उत्पन्न बाजार समित्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत एक हजार मॅट्रिक टन शेतमाल साठवणूक क्षमतेची गोदामे बांधून देण्याचा निर्णय दिनांक २५ जुलै, २०१८ रोजी घेतला असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयास सात वर्षे होवूनही अद्याप गोदामे बांधून पूर्ण झाली नसल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे चौकशीच्या अनुषंगाने सदरहू गोदामांचे बांधकाम किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (१६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील १०८ कृषी उत्पन्न बाजार समित्यांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रत्येकी एक हजार मेट्रिक टन शेतमाल साठवणूक क्षमतेची गोदामे बांधून देण्यासाठी दिनांक २५/०७/२०१८ रोजीच्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या २५ व्या State Level Sanctioning Committee बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १२/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषी पणन मंडळास "नोडल एजन्सी"म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

एकूण १०८ गोदामांपैकी १०१ गोदामांचे बांधकाम पूर्ण झालेले असून सदर गोदामे वापरासाठी संबंधित कृषी उत्पन्न बाजार समित्यांना हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. (१०१ गोदामांची यादी सोबत जोडली आहे.) उर्वरित ७ गोदामांचे बांधकाम प्रगतीमध्ये असून सदर ७ गोदामे ऑगस्ट २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या दिनांक ३/०५/२०२४ रोजीच्या ३६ व्या State Level Sanctioning Committee बैठकीमध्ये या प्रकल्पास दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पास सप्टेंबर २०२५ अखेर मुदतवाढ मिळणेसाठी कृषी पणन मंडळाने

दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या संबंधित यंत्रणेला विनंती केलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कौशल्य विकासासाठी २३०० कोटी रुपये खर्च करुन विविध योजना व उपक्रम राबविले जाणार असलेबाबत

**(१५) १९४४ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कौशल्य विकासासाठी २३०० कोटी रुपये खर्च करुन विविध योजना व उपक्रम राबविले जाणार असून त्याकरीता जागतिक बँकेशी करार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त करारानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमधून ५० हजार युवक-युवतींना प्रशिक्षण दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईबरोबरच नागपूर, पुणे, नाशिक, अमरावतीसह, छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्र कार्यरत होणार असल्याने कौशल्य विकास विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग नोकरी देणाऱ्या संस्थाबाबत सर्वसमावेशक असा एकत्रित कायदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत जागतिक बँक सहाय्यित मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (Development of Applied Knowledge and Skills for Human Development (DAKSH)) प्रकल्प राबविण्यास दिनांक १८/१२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाची किंमत रुपये २३०७ कोटी आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून मॉडेल ITI's तयार करणे, जागतिक कौशल्य केंद्राची निर्मिती, डाटा सेंटरची निर्मिती, विभागांतर्गत कार्यालयांचे बळकटीकरण व अद्ययावतीकरण तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचेच उद्योग केंद्रित कालसुसंगत कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करणे आणि उद्योजकता विकास कार्यक्रम राबविणे यांसारख्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे. दक्ष प्रकल्पासंदर्भात दिनांक २७/१२/२०२४ रोजी करार झाला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील युवा वर्गास त्यांच्या शिक्षणानंतर कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दिनांक ०९/०७/२०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्यपुरस्कृत "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्राचे रहिवाशी असलेल्या

१८ ते ३५ वयोगटातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनां मध्ये ११ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच इयत्ता बारावी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थीना प्रतिमाह रुपये ६,०००/-, आय.टी.आय/पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थीना प्रतिमाह रुपये ८,०००/- व पदवी/पदव्युत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थीना प्रतिमाह रुपये १०,०००/-इतके विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर योजना दक्ष प्रकल्पांतर्गत येत नाही.

(३) दक्ष प्रकल्पांतर्गत मुंबईसह नागपूर, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर येथे उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) कार्यरत करण्याचे प्रस्तावित आहे. यासंदर्भात उच्च तंत्र शिक्षण विभाग नोकरी देणाऱ्या संस्थाबाबत सर्वसमावेशक असा एकत्रित कायदा करण्याचे विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गवाणपाडा, मुलुंड (जि.मुंबई) येथील मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील कामगारांची अधिकाऱ्यांमार्फत पिळवणूक होत असल्याबाबत

**(१६) २११५ (२४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील राडारोडा उचलण्याचे कंत्राट प्राप्त झालेल्या 'मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीच्या गवाणपाडा, मुलुंड येथील डेपोत कार्यरत असलेल्या कंत्राटी वाहनचालकांचे कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शोषण सुरू असल्याची बाब दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी कार्यरत वाहनचालकांकडून कंपनीच्या पर्यवेक्षकांकडून जबरदस्तीने ओव्हरटाईम करण्यास व अवजड वाहने अविरतपणे रस्त्यावर चालविण्यास भाग पाडले जात असल्याने चालकांकडून अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून ओव्हरटाईम करण्यास नकार देणाऱ्या एका कर्मचाऱ्यास कंपनीच्या पर्यवेक्षकांनी दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मारहाण केल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कंत्राटी वाहनचालकांची पिळवणूक करणाऱ्या संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (२३-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही

सदर प्रकरणाबाबत या विभागास कोणतेही निवेदन/ तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे आहे,

सदरबाबत सुपरवायझर यांनी मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत ड्रायव्हर म्हणून कर्तव्य करत असलेले कर्मचारी नामे अनिरुध्द चव्हाण यांना गाडी घेवून दुसरी ट्रिपला जाण्यास सांगितले. त्यावेळी सदर कर्मचारी यांनी सुपरवायझर यांना दुसऱ्या ट्रिपला जात नसल्याचे सांगितले. त्यावेळी सदर ड्रायव्हर व सुपरवायझर यांचेत वाद झाल्यानंतर सुपरवायझर यांनी कर्मचारी नामे अनिरुध्द चव्हाण यांना शिवीगाळ करुन हाताने मारहाण केल्याबाबत नवघर पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(३) सदर बाबत प्राथमिक चौकशी करुन नवघर पोलीस ठाणेस दिनांक २४/०१/२०२५ रोजी अदखलपात्र गु.र.क्र.९३/२५ अन्वये नोंद घेण्यात आली आहे. तसेच अदखलपात्र गु.र.क्र.९३/२५ मधील विरोधक कंपनीचे सुपरवायझर यांचेवर बीएनएसएस कलम १२६ अन्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.

याचबरोबर क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी तथा निरीक्षक यांनी मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंत्राटदारास किमान वेतन अधिनियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम १९३६, महाराष्ट्र किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३ व कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० अंतर्गत आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने निरिक्षण शेरे दिनांक २५/०२/२०२५ रोजी पारित आले.

उक्त निरिक्षण शेऱ्यांच्या अनुषंगाने संबंधित आस्थापनेकडून समाधानकारक पुर्तता अहवाल प्राप्त न झाल्यामुळे मे. मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड यांचे विरूध्द मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, ५ वे न्यायलय दादर, मुंबई यांचे न्यायालयात दिनांक १०/०३/२०२५रोजी खटले दाखल करण्यात आले असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अधिनियमाचे नाव | खटला क्रमांक |
|---|---|
| किमान वेतन अधिनियम १९४८ | ११३/एसएस/२०२५ |
| वेतन प्रदान अधिनियम १९३६ | ११०/एसएस/२०२५ |
| महाराष्ट्र किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३ | १११/एसएस/२०२५ |
| कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० | ११२/एसएस/२०२५ |

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## उरण (जि.रायगड) येथील पुनाडे धरणातील फिल्टरची दुरुस्ती न झाल्याने अनेक गावांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१७) २१९५ (१७-०४-२०२५) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील पुनाडे धरणातील फिल्टर खराब होऊन त्याची दुरुस्ती न झाल्याने पुनाडे, वशेणी सारडे, पिरकोन, पाले, गोवठणे, आवरे, कडापे व पाणदिवे या गावातील ग्रामस्थांना गढूळ व दूषित पाणीपुरवठा होत असल्याने रोगराई पसरुन गावकऱ्यांमध्ये डायरीया व काविळीची लक्षणे दिसून आल्याची बाब दिनांक ६ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिण्यासाठी गावकऱ्याना बंद बाटल्यांचे पाणी विकत घ्यावे लागत असून, सदरच्या गावातील ग्रामस्थांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याने पुनाडे धरणातील फिल्टरची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत असून याबाबत आठ गावातील पाणी समिती याची कोणतीही दखल घेत नसल्याची तक्रार ग्रामस्थानी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उरण (जि.रायगड) येथील गावांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत ग्रामस्थांनी केलेली मागणी तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२४-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

अस्तित्वातील पुनाडे पाणीपुरवठा योजनाद्वारे आठगांव पाणीपुरवठा योजना समितीमार्फत दैनंदिन पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत पुनाडे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेंतर्गत अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्रामधून शुध्द स्वरूपात पाणीपुरवठा होणेसाठी आवश्यक स्थापत्य व यांत्रिकी दुरूस्तीची सर्व कामे पूर्ण करून, सदर जलशुध्दीकरण केंद्र ०१ जून, २०२४ पासून आठगांव समितीला दैनंदिन पाणी पुरवठ्याकरीता हस्तांतरीत करण्यात आले आहे.

पुनाडे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामाची ७६ टक्के प्रगती झाली आहे. सदर योजनेची उर्वीरत कामे ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात केंद्र शासनाच्या शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१८) १५०६३ (३१-१०-२०२२) अॅड.निरंजन डावखरे, श्री.जयंत आसगावकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासनाच्या शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरु होऊन १० वर्षे पूर्ण झाली तरीही ६५ टक्के शाळा या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कायद्यानुसार शाळेसाठी इमारत, मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोली, शिक्षकांसाठी वर्ग खोली, अपंग विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शाळेत सोयी-सुविधा, मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालये, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, मध्यान्ह भोजनासाठी खोली (Mid-Day-Meal) स्वतंत्र प्रसाधनगृह, शाळेला संरक्षक भिंत व खेळाचे मैदान हे १० निकष पूर्ण करणे बंधनकारक असतानाही याची प्रभावीपणे अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या शिक्षण हक्क कायद्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणता कृती आराखडा तयार केला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शासन व जिल्हा परिषदांकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा परिषद सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, १५ वा वित्त आयोग, आमदार- खासदार

निधी,सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान इत्यादीमधुन वर्गखोली दुरूस्तीची/ बांधकामांची तजवीज ठेवली आहे.

तसेच खाजगी शाळांमध्ये सदर मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनाची आहे.

(४) व (५)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(१९) १५०६४ (३१-१०-२०२२) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक सोयी-सुविधांची कमतरता असल्याचे माहे एप्रिल, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात १ लाखांपेक्षा जास्त शाळा सुरु असताना हजारो शाळांमध्ये ग्रंथालय, संगणक सुविधा, इंटरनेट सुविधा, विजेची सुविधा, शाळांमध्ये मुला-मुलींना पुरेशा प्रमाणात शौचालय सुविधा, हात धुण्याची सुविधा, अपंग मुलांना चढण्या-उतरण्यासाठी रॅम्प, रेलिंग, पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था आदी शैक्षणिक सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या सर्व शैक्षणिक सोयी-सुविधा विद्यार्थी, शिक्षक-पालकांना देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१७-०६-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) शासन व जिल्हा परिषदांकडून सुविधांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा परिषद सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, १५ वा वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान इत्यादींमधुन शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याची तजवीज ठेवली आहे.

तसेच खाजगी शाळांमध्ये सदर मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित व्यवस्थापनाची आहे..

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सन २००० पूर्वी सुरु असलेल्या काही महाविद्यालयांना किंवा विद्या शाखांना अनुदान मंजुरी मिळणेबाबत

**(२०) १७६७२ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००० पूर्वी सुरु असलेल्या काही महाविद्यालयांच्या किंवा विद्या शाखांच्या अनुदान मंजुरीसाठी शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिनांक १० जुलै, २०१९ रोजी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाखा अनुदान मंजुरीसाठीच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०३-०८-२०२३) :** (१) राज्यात २४/११/२००१ पुर्वी कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या महाविद्यालयांच्या किंवा विद्याशाखांच्या अनुदान मंजूरीसाठी शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिनांक १०/११/२०२० रोजी प्रस्ताव सादर केला आहे.
(२) व (३) दिनांक २४/११/२००१ पूर्वी कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या महाविद्यालयांना/विद्याशाखांना १००% अनुदानावर आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.